# पावसातील पूरस्थिती टाळण्यासाठी मेट्रो ३ मार्गिकेदरम्यान ३३८ पंप

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यान पावसाळ्यातील पूरजन्य परिस्थिती टाळण्यासाठी ३३८ पंप बसवण्यात येणार आहेत.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या ३३.५ किमी भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. सात पॅकेजमधील जवळपास १३ भुयारे खणण्यात एमएमआरसीएला यश आले आहे. मात्र, पावसाळ्यात या मार्गिकेदरम्यान पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी विशेष काळजी घेण्यात येत आहे. २०१८ रोजी अधिक पावसाळ्यामुळे जेथे पूरजन्य परिस्थिती उद्‌भवू शकते, अशा १७ जागा मुंबई महानगरपालिकेने निश्चित केल्या होत्या. यंदा मात्र मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने अधिक काळजी घेत २७ ठिकाणी ३३८ डिवॉटरिंग पंप स्थापित केले आहेत. तसेच परिस्थितीनुसार विविध ठिकाणी ३०८ लोक तैनात करण्यात येणार आहेत. एमएमआरसीएलनेही आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन केला असून, मुंबई महानगरपालिकेचे सहकार्य लाभणार आहे.

*सध्या मुंबईत विविध ठिकाणी स्ट्रॉम वॉटर पम्पिंगचे काम सुरू असून, या कामामुळे खणलेल्या खड्ड्यात लोकांना आपला जीव गमवावा लागू शकतो. त्यामुळे ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश अधिकाऱ्यांनी दिले आहेत.*

पाण्याचा निचरा लवकर व्हावा तसेच कोठेही पाणी साचू नये, यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे.